# रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ

स्थापना महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७/२०२१ दिनांक २३ मार्च, २०२१

RATAN TATA MAHARASHTRA STATE SKILLS UNIVERSITY

जा. क्र.: रटामराकौवि/नागपूर/२०२६-२७/ फोटोग्राफी / 485 दिनांक: 31 AUG 2026

## दरपरत्रक सूचना

विषय: रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई अंतर्गत नागपूर केंद्र येथे सातत्याने होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी सेवांसाठी पुरवठा करणेबाबत.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई यांचे कार्यालय एलफिन्स्टन महाविद्यालय येथे सुरु करण्यात आले आहे. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अंतर्गत नागपूर, खारघर, विद्याविहार, पुणे, कोपरी, ठाणे येथे उपकेंद्र सुरु करण्यात आले आहे.

विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या नागपूर केंद्र येथे सातत्याने होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी सेवांसाठी दर करार (Rate Contract) करणे त्याचप्रमाणे योग्य व कमी दरामध्ये विद्यापीठाच्या नागपूर केंद्रांमध्ये वेळोवेळी फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी सेवांसाठी पुरवठा करण्याकरिता मा. कुलसचिव, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई यांच्या अनुमतीने संस्था/पुरवठादार यांचेकडून सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, नागपूर केंद्रांमध्ये स्टेशनरी व इतर आवश्यक साहीत्यांचा पुरवठा करण्याकरिता दरकरार करण्यासाठी, आपल्याकडील दरपत्रके मा. कुलसचिव, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, नागपूर केंद्र, दुसरा मजला, जयप्रकाश नगर मेट्रो स्टेशन, जयप्रकाश नगर चौक, वर्धा रोड, नागपूर - ४४००२५ या पत्यावर दि. ०८/०९/२०२६ रोजी सायंकाळी ०३.०० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्यामध्ये पाठविण्यात यावीत. उशिरा प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकारण्यात येणार नाहीत.

दरपत्रकामध्ये दर नमूद करताना ते सर्व करासहीत, वाहतूक खर्च, लोंडींग अनलोडींग आणि इतर तत्सम खर्चासह असावेत अथवा त्यामध्ये याबाबत स्पष्ट उल्लेख असावा तसेच सिलबंद पाकिटावर करावयाच्या कामाच्या बाबींचा आणि दरपत्रक सादरीकरणाचा अंतिम दिनांकाचा स्पष्ट उल्लेख असावा.

प्राप्त झालेलूया दरपत्रकांपैकी काही अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला असून याबाबतचे कोणतेही कारण देणे बंधनकारक नाही.

प्राप्त झालेल्या दरापैकी कमी असलेल्या दरास काम देण्यात येईल. सदर काम द्यावयाचे सर्व अधिकार मा. कुलसचिव, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई यांनी राखून ठेवले आहेत.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई येथील विद्यापीठाच्या नागपूर केंद्र येथे सातत्याने होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी सेवांसाठी पुरवठा करण्याकरिता आवश्यक साहीत्यांचा तपशील सोबत जोडलेल्या प्रपत्र - १ मध्ये उपलबद्ध आहे.

डॉ. वैभव नरवडे
(कुलसचिव)
र.टा.म.रा.कौ.वि., मुंबई.

# रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, नागपूर केंद्र

Annexure - 1 – Photography and Videography details for Rate contract

Location : Nagpur

| Sr. No. | Particulars | Unit | Rate in Rs. |
|---|---|---|---|
| 1 | Event Photography (Still Coverage) | Per Event | |
| 2 | Event Videography (Raw Footage) | Per Event | |
| 3 | Edited Highlight Video (3–5 min) | Per Video | |
| 4 | Full Event Edited Video | Per Event | |
| 5 | Live Streaming Setup | Per Event | |
| 6 | Stage Coverage with Multiple Cameras | Per Event | |
| 7 | Drone Coverage (if required) | Per Event | |
| 8 | Photo Album (Printed) | Per Album | |
| 9 | *Extra Hour Charges* | Per Hour | |
| 10 | Data Delivery (Hard Disk / Cloud Transfer) | Per Assignment | |

Registrar

Ratan Tata Maharashtra State Skills University